## निर्लेखित करावयाच्या वाहनांच्या दरपत्रकाकरिता अटी व शर्तीचा मसूदा

| अ.क्र. | नियम व अटी |
|---|---|
| १ | दोन स्वतंत्र मोहोरबंद पाकीटात दरपत्रके समक्ष/ पोस्टाद्वारे दिनांक २४/०४/२०२६ ते दिनांक ३०/०४/२०२६ या कालावधीत सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई या पत्त्यावर सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत सादर करावी. त्यावर **"प्रत्येक वाहनाकरिता वाहन क्रमांकाचा स्पष्ट उल्लेख असावा (उदा.MH-01-AN -****)"** या वाहनाच्या खरेदीसाठी दरपत्रक असा स्पष्ट उल्लेख असावा. |
| २ | **"जशी आहेत तशा स्थितीत"** विक्री करिता असलेली वाहने हे तपासणीसाठी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई-४०० ०३२ येथे तळघरात ठेवण्यात आली आहेत. |
| ३ | ज्यांना रजिस्टर पोस्टाने दरपत्रके पाठवावयाची आहे, त्यांनी दरपत्रक कोणत्याही परिस्थितीत दिनांक ३०/०४/२०२६ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत या कार्यालयास कार्यालयीन कामाकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत प्राप्त होती याची दक्षता घ्यावी अथवा वरील कालावधीत समक्ष सादर करावी. |
| ४ | इसारा रक्कम रू.२,०००/- (प्रत्येक दरपत्रकास) **"कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई "** यांचेकडे डिमांड ड्राफ्टद्वारे जमा करावी. |
| ५ | इसारा रक्कम भरल्यानंतर **"कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई** यांचेकडून प्राप्त झालेली पावती, दरपत्रकाच्या अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. इसारा रक्कम भरल्याबाबतचा पुरवा सोबत सादर केलेला नसल्यास दरपत्रक ग्राह्य धरले जाणार नाही. |
| ६ | दरपत्रक उघडण्याच्या वेळी दरपत्रकाधारकास किंवा अधिकृत प्रतिनिधी यांना हजर रहाता येईल. |
| ७ | यशस्वी दरपत्रक ठरल्यानंतर रोख रक्कम भरून एक आठवड्यात वाहनाचा प्रत्यक्ष ताबा घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांचे दरपत्रक रद्दबातल ठरविला जाईल व इसराऱ्याच्या रक्कमेचा परतावा मिळण्यास मुकावे लागेल. |
| ८ | यशस्वी खरेदीदाराने मोहरबंद पाकीटामध्ये नमूद केलेल्या वाहनांच्या खरेदीच्या रकमेच्या २५ टक्के इतकी रक्कम विक्रीच्या दिवशी अथवा लगतच्या दोन दिवसात बयाणा रक्कम म्हणून **"कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय"** यांचेकडे डिमांड ड्राफ्टद्वारे भरावी लागेल. खरेदीच्या दिनांकापासून ३ दिवसांचे आत उर्वरित रक्कम भरुन संबंधित वाहन उचलले नाही तर संबंधित खरेदीदाराचे नाव रद्द करण्यात येईल व बयाणा रक्कम (वाहनाच्या खरेदीच्या रकमेच्या २५% इतकी रक्कम) ही रक्कम जप्त करण्यात येऊन ती शासन जमा करण्यात येईल. तसेच संपूर्ण रक्कम भरल्यानंतर वाहन उचलण्यास विलंब केल्यास प्रतिदिनी रुपये ५००/- याप्रमाणे त्यांचेवर दंड आकारणी करण्यात येईल. |

..२/-

| | |
|---|---|
| ९ | वस्तु व सेवाकर अधिनियमानुसार, यशस्वी दरपत्रकाधारकास आवश्यक तो वस्तु व सेवाकर (GST) भरावा लागेल तसेच वस्तु व सेवाकर (GST) भरल्याचा पुरवा महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयास सादर करावा लागेल. |
| १० | दरामध्ये तसेच दरपत्रकाच्या कागदपत्रात कोठेही खाडाखोड, अतिरिक्त शब्द, पांढरी शाई, इ.वापरणे टाळावे चुकून अशी परिस्थिती उद्भवल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी तसे न केल्यास दरपत्रक रद्द करण्याचे अधिकार **सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय** हे राखून ठेवत आहेत. |
| ११ | वाहन विक्री संदर्भातील सर्व कार्यवाही **मा. सचिव-४ यांचे निदेशानुसार करण्यात येत असल्याने वाहनांच्या विक्री प्रक्रियेच्या संदर्भात काही वाद (Dispute) निर्माण झाल्यास सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचा निर्णय अंतिम राहील.** |
| १२ | महाराष्ट्र विधामंडळ सचिवालयाच्या वाहनाच्या हस्तांतरण नोंदणीबाबत सर्व प्रक्रिया यशस्वी दरपत्रकधारकास स्वखर्चाने करावी लागेल. |
| १३ | **कोणतेही कारण न देता कोणतेही दरपत्रक किंवा सर्व दरपत्रके फेटाळण्याचा अधिकार सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचेकडे राहील.** |

- **वाहनांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-**

**१) MH-०१-AN-२३२४ (कोरोला ॲल्टीस) ची रू.१,५२,६६६/- इतकी खरेदीची किंमत होईल.**

| अ.क्र. | वाहनाचा तपशील |
|---|---|
| १ | Vehicle : MH01AN2324 |
| २ | Model : CORORLLA ALTIS 1.8 V (SALOON) |
| ३ | Engine No : 2ZR0939900 |
| ४ | Chassis No:MBJ53REE204602611 |
| ५ | Class : LMV |
| ६ | MFG CD : TOYKIR |
| ७ | Product Year (Vehicle Purchase): 2012 |
| ८ | आतापर्यंत चालविलेले वाहनाचे अंतर : 2,40,000 KM |

**२) MH-०१-AN-८९९८ (टोयोटा इनोव्हा) ची रू.२,५२,४६७/- इतकी खरेदीची किंमत होईल.**

| अ.क्र. | वाहनाचा तपशील |
|---|---|
| १ | Vehicle : MH01AN8998 |
| २ | Model : INNOVA 2.5V (E4) |
| ३ | Engine No : 2KDS556486 |
| ४ | Chassis No:MBJ11JV4007539635 |
| ५ | Class : LMV |
| ६ | MFG CD : TOYKIR |
| ७ | Product Year (Vehicle Purchase): 2015 |
| ८ | आतापर्यंत चालविलेले वाहनाचे अंतर : 2,39,985 KM |

♦ **दरपत्रकधारकांनी सादर करावयाची कागदपत्रे :**

१. खरेदीदाराने दोन पासपोर्ट फोटो.

२. ओळखीचा पुरावा (पॅनकार्ड/आधारकार्ड/पासपोर्ट/मतदार ओळखपत्र इ.यापैकी कोणतेही एक.)

३. कंपनी/ फर्मच्या नावे वाहन खरेदी करावयाचे असल्यास त्याचे वस्तु व सेवाकर (GST) अंतर्गत नोंदणी असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

४. इसाऱ्याची रक्कम भरलेली पावती क्रमांक व दिनांक

♦ **दरपत्रक पाठविण्याकरिता पत्ता:**

कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

♦ **महात्वाच्या दिनांक व वेळ :**

१. दरपत्रके सादर करण्याचा पहिला दिनांक २४ एप्रिल, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून.

२. दरपत्रके सादर करण्याचा शेवटचा दिनांक ३० एप्रिल, २०२६ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत.

३. दरपत्रके उघडण्याकरिता दिनांक ४ मे, २०२६ रोजी दुपारी २.०० वाजता.

****